# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


३४० - २३ दिनांक : - ०३/१०/२०२३

## लाखो रुपयाची फसवणुक करुन ०२ वर्षापासुन पोलीसांना गुंगारा देणाऱ्या दोन गुन्हयातील आरोपीस मध्यवर्ती गुन्हे शाखे कडून अटक.

अर्थिक गुन्हे शाखेकडे तपासावर असणाऱ्या गुन्हयातील आरोपी अटक करण्याबाबत वरिष्ठांनी सुचना व मार्गदर्शन केले होते. त्याबाबत अधिक माहिती घेतली असता आर्नाळा पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं २७३/२०२१, भा.दं.वि.सं. कलम ४२०,४६५,४६७,४६८,४७१,४७२,४७४,१२० (ब) तसेच गुन्हा रजिष्टर २८१/२०२१, भा.दं.वि.सं. कलम ४२०,४६५,४६७,४६८,४७१,४७२,४७४,१२० (ब) गुन्हा दाखल झाले असुन सदर दोन्ही गुन्हयातून आरोपीतांनी सुमारे ५६,२९,५२१/- रु. फसवणुक केली होती. सदर गुन्हयाचा तपास सध्या अर्थिक गुन्हे शाखा करीत असून सदर गुन्हे दाखल होवून बराच कालावधी होवून देखील आरोपी मिळुन येत नसल्याने दोन्ही गुन्हे अदयाप उघडकीस आले नव्हते.

मा. वरिष्ठांचे आदेशाने मध्यवर्ती गुन्हे शाखा समांतर तपास करीत असतांना यातील पाहिजे आरोपीत नामे विनोद मिश्रा याचेबाबत माहिती घेवून त्याचे तांत्रिक विश्लेषण करुन तो आपले अस्तीत्व लपवून नालासोपारा येथे राहणेस गेले बाबत माहिती प्राप्त झाली त्या अनुषंगाने गोपनीय माहितीव्दारे तो पुर्वी राहत असलेल्या भाईंदर (प) भागातून त्याचा फोटो प्राप्त करुन नालासोपारा येथील गुप्त बातमीदारांना दाखवून त्याचा ठावठिकाणाचा शोध घेवून मध्यवर्ती गुन्हे शाखेच्या पथकाने गुन्हयातील आरोपी नामे विनोद प्रेमचंद मिश्रा, वय-३९, धंदा-ईस्टेट एजंट, रा. बी२०३, साई कल्प अपार्टमेन्ट, पाटणकर छेडा रोड, नालासोपारा (प), ता.वसई, जि. पालघर यास दिनांक २६/०९/२०२३ रोजी २२.३० वा. ताब्यात घेवून वरील दोन्ही गुन्हे उघडकीस आणले असून आरोपीस पुढील तपास कामी आर्थिक गुन्हे शाखा, मि.भा.व.वि. यांचे ताब्यात दिले आहे.

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), व श्री. अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पो.नि. राहुल राख, पो.उप.निरी. हितेंद्र विचारे, पो.हवा. मनोहर तावरे, संग्राम गायकवाड, राजवीर संधु, राजाराम काळे, हनुमंत सुर्यवंशी यांनी केली आहे.